जनमत सर्वसामान्यांचे

मंगळवार, दि.२४ सप्टेंबर २०२४

# तंत्रज्ञानाच्या युगात भाषेच्या विद्यार्थ्यांना सुवर्णसंधी : डॉ.तायाजी लोंढे





संग्रामनगर दि.२२ (प्रतिनिधी)- अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस समारंभाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमांचे प्रमुख पाहुणे श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील बावडा, महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ.तायाजी लोंढे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्री.डॉ.शिवप्रसाद टिळेकर होते.

या कार्यक्रमाची सुरुवात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. प्रमुख पाहुणे लोंढे यांनी आपल्या मनोगतातुन हिंदी भाषेच्या सहाय्याने अनुवाद, जाहिरात, संचार माध्यमं, इलेक्ट्रॉनिक मिडिया, पर्यटन, सोशल मिडिया, इंटरनेट इत्यादी क्षेत्रात रोजगार मिळू शकतात.भाषेवर प्रभुत्व मिळविल्यास चित्रपट क्षेत्रात पटकथा लेखन, डबींग इत्यादी मधून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.हिंदी विभागाचे माजी विद्यार्थी या क्षेत्रात सक्रिय आहेत. तसेच हिंदी भाषा ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात जास्त बोलली जाणारी भाषा आहे असा आवर्जुन उल्लेख केला.यावेळी प्राचार्य प्रो.डॉ.शिवप्रसाद टिळेकर यांनी आपल्या मनोगतात हिंदी येणाऱ्या काळात अंतरराष्ट्रीय भाषा म्हणून ओळखली जाईल असी आशा व्यक्त केली.हिंदी आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अतिशय महत्त्वाची भाषा बनत आहे.

हिंदी दिवसाचे औचित्य साधून हिंदी विभागाच्या वतीने महाविद्यालयात हिंदी सप्ताह साजरा करण्यात आला.या सप्ताहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले.यामध्ये काव्य वाचन प्रतियोगिता, निबंध लेखन प्रतियोगिता व सामान्य ज्ञान प्रश्न मंजूषा प्रतियोगिता या तीन्ही स्पर्धांमध्ये जवळपास १५० विद्यार्थी सहभाग झाले. या स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे- १) काव्य वाचन स्पर्धा- प्रथम क्रमांक- गौरी लोंढे, व्दितीय क्रमांक- सना शेख, तृतीय क्रमांक- गायत्री पाटील, उत्तेजनार्थ - अकलेश गेजगे, प्रतीक्षा मस्के २) सामान्य ज्ञान प्रश्न मंजूषा- प्रथम क्रमांक (विभागून) राज शिंदे, श्रावणी ढगे, व्दितीय क्रमांक (विभागून)-मोहिने तुपे, आरती साठे, तृतीय क्रमांक जान्हवी माने ३) निंबध लेखन-प्रथम क्रमांक- गौरी गौड, व्दितीय क्रमांक-गौरी लोंढे, तृतीय क्रमांक-हितेष पुंज उत्तेजनार्थ राजनंदिनी बोडरे, ज्योति भगत यांनी यश मिळवले. बक्षीस प्राप्त सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मानचिन्ह प्रदान करण्यात आले.या कार्यक्रमाचे औचित्य साधून एम.ए.हिंदी विषयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवून या विषयातील प्रथम क्रमांकाचा सौ.सविता गायकवाड सन्मान प्राप्त करणाऱ्या हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांनी गिरीजा गायकवाड यांनी मार्च २०२३ च्या परीक्षेत यश संपादन केले.या विद्यार्थ्यांनीचा यथोचित सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.या सप्ताहात काव्य वाचन स्पर्धेचे परीक्षक- प्रा.विनायक सूर्यवंशी, डॉ. विजयकुमार शिंदे, निबंध लेखन स्पर्धेचे परीक्षक- डॉ.निवृत्ती लोखंडे, विजयकुमार शिंदे तसेच सामान्य ज्ञान प्रश्न मंजूषा स्पर्धेचे परीक्षक- डॉ.विजयकुमार शिंदे व प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी काम पाहिले.

या कार्यक्रमांचे प्रस्ताविक राज शिंदे, प्रमुख पाहुण्याचा परिचय रोहिणी चव्हाण तसेच तमन्ना तिकोटे, ऋतुजा शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व सूत्रसंचालनाची धुरा संभाळण्याचे काम गौरी लोंढे हिने अत्यंत प्रभावीपणे केले शेवटी सर्वांचे आभार साक्षी भाकरे या विद्यार्थीनीने व्यक्त केले.याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.दादासाहेब कोकाटे, डॉ.आण्णासाहेब नलवडे, प्रा.रणजीत लवटे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी हिंदी विभागातील सर्व विद्यार्थी, डॉ.विजयकुमार शिंदे व प्रा.सोमनाथ चव्हाण यांनी हिंदी विभाग प्रमुख डॉ.निवृत्ती लोखंडे यांच्या मार्गदर्शनानुसार परिश्रम घेवुन कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

जनमत सर्वसामान्यांचे
शनिवार, दि.१० ऑगस्ट २०२४

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA Akluj Dist. Solapur 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात रक्तदान शिबिर

अकलूज, दि.०९ (प्रतिनीधी)– येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाले .यावेळी शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँक अकलूज येथील तांत्रिक सहाय्यक हनुमंत खंडागळे, अनिल लोखंडे ,अभिजीत पाटील, सौ. सोनाली कोकाटे सौ सुमन भेंडे सौ .विद्या काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर आपल्या मनोगतात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या आहारात सकस अन्न घेणे आवश्यक आहे. हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये, फळे व चौरस आहार घेणे आवश्यक आहे .रक्त हे कृत्रिमरीत्या प्रयोगशाळेत किंवा कारखान्यात बनवता येत नाही. त्यामुळे मानवी रक्ताला पर्याय नाही .आपल्या देशाची एकूण रक्ताची गरज जेवढी आहे त्यापेक्षा रक्त कमी संकलित होते. त्यामुळे तरुणांनी रक्तदान करण्यासाठी पुढे येणे आवश्यक आहे .कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय मगर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.स्मिता पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सज्जन पवार यांनी केले.याप्रसंगी शिबिरात प्रा. विष्णू सुर्वे, अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय वेळापूरचे प्राचार्य डॉ. मनोज नांगरे, शारीरिक



संचालक अरविंद वाघमोडे, डॉ शिरीषकुमार शिंदे,डॉ. बाळासाहेब मुळीक, डॉ. सतीश देवकर, डॉ. जनार्दन परकाळे, डॉ. चंकेश्वर लोंढे, डॉ. चंद्रशेखर ताटे देशमुख प्रा. प्रसाद लोहार, डॉ. सविता सातपुते, प्रा. दादासाहेब कोकाटे, प्रा. नंदकुमार गायकवाड ग्रंथपाल डी. एस. पाटील, प्रबंधक राजेंद्र बामणे कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे हेही सहभागी झाले.या शिबिरात ३० जणांनी रक्तदान केले.हे शिबीर यशस्वी होण्यासाठी शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँकेचा स्टाफ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी यांनी परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर
सोमवार, दि. २३ सप्टेंबर २०२४

# मोहिते महाविद्यालयात हिंदी सप्ताह साजरा

✓ अकलूज/प्रतिनिधी

शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज येथे हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवसानिमित्त हिंदी सप्ताह साजरा झाला. कार्यक्रमांचे प्रमुख पाहुणे श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील बावडा, महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. तायाजी लोंढे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. शिवप्रसाद टिळेकर होते.

कार्यक्रमाची सुरुवात सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व आक्कासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रभारी प्राचार्य शिवप्रसाद टिळेकर यांनी हिंदी माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अतिशय महत्त्वाची भाषा बनत असल्याचे सांगितले. हिंदी सप्ताहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यांचे बक्षिस वितरण करण्यात आले.

**स्पर्धांचा निकाल** – १) काव्य वाचन-प्रथम क्रमांक- गौरी लोंढे, द्वितीय क्रमांक- सना शेख, तृतीय क्रमांक- गायत्री पाटील उत्तेजनार्थ - अकलेश गेजगे, प्रतीक्षा मस्के २) सामान्यज्ञान प्रश्न मंजूषा- प्रथम क्रमांक (विभागून)- राज शिंदे, श्रावणी ढगे, व्दितीय क्रमांक (विभागून)- मोहिने तुपे, आरती साठे, तृतीय क्रमांक- जान्हवी मान ३) निबंध लेखन- प्रथम क्रमांक- गौरी गौड, व्दितीय क्रमांक- गौरी लोंढे, तृतीय क्रमांक- हितेष पुंज, उत्तेजनार्थ - राजनंदिनी बोडरे, ज्योति भगत यांनी यश मिळवले. यावेळी एम. ए. हिंदी विषयात सोलापूर विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळणाऱ्या सविता गायकवाड, गिरीजा गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला.

परीक्षक म्हणून प्रा. विनायक सूर्यवंशी, डॉ. विजयकुमार शिंदे, डॉ. निवृत्ती लोखंडे, विजयकुमार शिंदे डॉ. विजयकुमार शिंदे व प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी काम पाहिले. प्रास्ताविक राज शिंदे, प्रमुख पाहुण्याचा परिचय- रोहिणी चव्हाण तसेच तमन्ना तिकोटे, ऋतुजा शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन गौरी लोंढे हिने केल. आभार साक्षी भाकरे हिने केले. प्रा.दादासाहेब कोकाटे, डॉ.आण्णासाहेब नलवडे, प्रा.रणजीत लवटे उपस्थित होते..डॉ.विजयकुमार शिंदे प्रा. सोमनाथ चव्हाण, डॉ.निवृत्ती लोखंडे आदींनी परिश्रम घेतले.




|| Tewo Sada Dnyanmaya Pradeep||

**Shikshan Prasarak Mandal, Akluj Sanchalit**

# Shankarrao Mohite Mahavidyala, Akluj
# Tal-Malshiras Dist-Solapur Pin - 413101

(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)

**NON MINORITY (AIDED)**

Applications are invited for the Post of PRINCIPAL from the Academic Year 2024-25

| Sr. No. | Designation | Total Vacant Posts |
|---|---|---|
| 1) | Principal | 01 |

**Instructions**

1) The above post is open to all, however candidates from any category can apply for the post.
2) Educational Qualification, Service Conditions & Pay Scale, will be applicable as per existing rules prescribed by, the UGC Notification dtd. 18th July 2018, Govt. of Maharashtra resolution No. Misc 2018/ C.R.56/18 UNI -1 dts. 8th March 2019 and University Circular No. PAHSUS/Estt/7th pay / 2019/2285/ dtd. 25th March 2019.
3) Candidates should submit their Academic Research Score (Academic Performance Indicator) report with related documents. (Only for the post of Principal)
4) A relaxation of 5% shall be allowed at the Bachelors as well as at the Masters level for the candidates belonging to SC/ST/OBC (Non-creamy Layer)/Differently-abled for the purpose of eligibility and assessing good academic record for direct recruitment.
5) Reserved candidates, who are domiciled out of Maharashtra State, will be treated as Open Category candidates.
6) Reserved candidates should also to send a copy of their application to the Deputy Registrar, Special Cell, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.
7) Application received after the last date will not be considered. The College will not be responsible for postal delay, if any.
8) Reservation for women and disable persons will be as per the Govt. norms.
9) Reserved category candidates shall produce the Caste Validity Certificate as per the directives issued by the State Government vide Circular No. BCC201 /Pra.Kra.1064/2011/ 16B dated 12-12-2011.
10) Reserved category candidates (except SC/ST) shall produce Non-Creamy Layer Certificate at the time of interview.
11) Applicants who are in service must send their application through proper channel.
12) Applicants are required to account for breaks, if any, in their academic career.
13) Incomplete application will not be entertained.
14) T.A., D.A. will not be paid for attending the interview.
15) Applications with full details should reach to the President / Secretary, Shikshan Prasarak Mandal, Akluj, Tal-Malshiras Dist-Solapur Pin - 413101 within 30 days from the date of publication of this advertisement. Incomplete applications will not be entertained.
16) This is University approved advertisement.

Place: - Akluj
Date: - 24/09/2024

**President/Secretary**
**Shikshan Prasarak Mandal, Akluj, Tal-Malshiras Dist-Solapur**

लोकमत हॅलो सोलापूर
मंगळवार २४.९.२०२४
https://epaper.lokmat.com

|| Tewo Sada Dnyanmaya Pradeep||

Shikshan Prasarak Mandal, Akluj Sanchalit

# Shankarrao Mohite Mahavidyala, Akluj

Tal-Malshiras Dist-Solapur Pin - 413101

(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)

**NON MINORITY: (AIDED)**

Applications are invited for the **Post of PRINCIPAL** from the Academic Year 2024-25

| Sr. No. | Designation | Total Vacant Posts |
|---|---|---|
| 1) | Principal | 01 |

**Instructions:-**

1) The above post is open to all, however candidates from any category can apply for the post.
2) Educational Qualification, Service Conditions & Pay Scale, will be applicable as per existing rules prescribed by, the UGC Notification dtd. 18th July 2018, Govt. of Maharashtra resolution No. Misc 2018/ C.R.56/18 UNI -1 dts. 8th March 2019 and University Circular No. PAHSUS/Estt/7th pay/2019/2285/ dtd. 25th March 2019.
3) Candidates should submit their Academic Research Score (Academic Performance Indicator) report with related documents. (Only for the post of Principal)
4) A relaxation of 5% shall be allowed at the Bachelors as well as at the Masters level for the candidates belonging to SC/ST/OBC (Non-creamy Layer)/Differently-abled for the purpose of eligibility and assessing good academic record for direct recruitment.
5) Reserved candidates, who are domiciled out of Maharashtra State, will be treated as Open Category candidates.
6) Reserved candidates should also to send a copy of their application to the Deputy Registrar, Special Cell, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur.
7) Application received after the last date will not be considered. The College will not be responsible for postal delay, if any.
8) Reservation for women and disable persons will be as per the Govt. norms.
9) Reserved category candidates shall produce the Caste Validity Certificate as per the directives issued by the State Government vide Circular No. BCC201 /Pra.Kra.1064/2011/16B dated 12-12-2011.
10) Reserved category candidates (except SC/ST) shall produce Non-Creamy Layer Certificate at the time of interview.
11) Applicants who are in service must send their application through proper channel.
12) Applicants are required to account for breaks, if any, in their academic career.
13) Incomplete application will not be entertained.
14) T.A., D.A. will not be paid for attending the interview.
15) Applications with full details should reach to the President/Secretary, Shikshan Prasarak Mandal, Akluj, Tal-Malshiras Dist-Solapur Pin - 413101 within 30 days from the date of publication of this advertisement Incomplete applications will not be entertained.
16) This is University approved advertisement.

Place: - Akluj, Date: - 24/09/2024.

**President / Secretary**
Shikshan Prasarak Mandal, Akluj,
Tal-Malshiras Dist-Solapur


सोलापूर, रविवार, २९ सप्टेंबर २०२४

सकाळ

# मोहिते महाविद्यालयात वनस्पतींवर कार्यशाळा

**अकलूज :** शंकरराव मोहिते महाविद्यालयात औषधी वनस्पतींवर कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत माजी वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. रामलिंग सावळजकर यांनी निसर्गातील विविध औषधी वनस्पतींची सविस्तर माहिती देऊन, या औषधी वनस्पती कोणत्या रोगावर उपयुक्त आहेत व त्यांचा औषध म्हणून उपयोग कसा करावा याविषयी सविस्तर माहिती दिली. यामध्ये तुळस, दुर्वा, आघाडा, अडुळसा, निरगुडी, अश्वगंधा, गुळवेल, कडुनिंब, शतावरी आदी वनस्पतींच्या मानवी जीवनातील उपयोगाबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन परकाळे यांनी मानवी जीवनातील आयुर्वेदाचे महत्त्व स्पष्ट केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय मगर यांनी केले. आभार डॉ. सज्जन पवार यांनी मानले. सूत्रसंचालन स्वयंसेविका गौरी लोंढे यांनी केले. यावेळी प्रा. स्मिता पाटील, प्रा. अरविंद वाघमोडे व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सकाळ
TODAY
सोलापूर, मंगळवार, १ ऑक्टोबर २०२४



॥ तेवो सदा ज्ञानमय प्रदीप ॥

|| Tewo Sada Dnyanmaya Pradeep ||
**Shikshan Prasarak Mandal's Akluj.**

# Smt. Ratnaprabhadevi Mohite Patil College of Home Science for Women

Akluj Tal- Malshiras Dist- Solapur Pin - 413101
(Affiliated to the S.N.D.T. Women's University, Mumbai)
Ph. No.(02185) 226433

## NON MINORITY (AIDED)

Applications are invited for the Post of PRINCIPAL from the Academic Year 2024-25

| Sr. No. | Post/Subject | No. of Post | Qualifications |
|---|---|---|---|
| 1. | PRINCIPAL (on tenure basis for a period of 5 years) | 1 (Open) | A Master's Degree with at least 55% of the marks or a relevant grade regarded as equivalent to 55% wherever grading system is followed by a recognized University. Ph.D. qualification is concerned / allied / relevant discipline with evidence of published work and research guidance. Associate Professor/Professor with a total experience of 15 years of teaching/ research/ administration in Universities / Colleges and other institutions of higher education. A minimum score as stipulated in the Academic Performance Indicator (API) based on Performance Based Appraisal System (PBAS) for Professors as developed by UGC in these Regulations. |

**Note :**

1. A minimum of 55% marks (or an equivalent grade in a point-scale, wherever the grading system is followed) at the Master's level shall be the essential qualification for direct recruitment of teachers and other equivalent cadres at any level. 1. A relaxation of 5% shall be allowed at the Bachelor's as well as at the Master's level for the candidates belonging to Scheduled Caste/ Scheduled Tribe/Other Backward Classes (OBC) (Non-creamy Layer)/ Differently- abled (a) Blindness and low vision; (b) Deaf and Hard Hearing; (c) Locomotor disability including cerebral palsy, leprosy cured, dwarfism, acid-attack victims and muscular dystrophy; (d) Autism, intellectual disability, specific learning disability and mental illness; (e) Multiple disabilities from amongst persons under (a) to (d) including deaf-blindness) for the purpose of eligibility and assessing good academic record for direct recruitment. The eligibility marks of 55% (or an equivalent grade in a point-scale, wherever the grading system is followed) a relaxation of 5% to the categories mentioned above are permissible, based only on the qualifying marks without including any grace mark procedure. A relaxation of 5% may be provided, from 55% to 50% of the marks to the Ph.D. degree holders who have passed their. Masters degree prior to September 19, 1991. A relevant grade which is regarded as equivalent of 55%, wherever the grading system is followed by a recognized university, at the Master's level shall also be considered valid.
2. For the open post candidates from backward classes as well as physically challenged person can also apply.
3. The reservation for women and physically challenged persons shall be as per the Govt. of Maharashtra rules.

**Pay Scale :** As per the U.G.C. and the State Government.

**Mode of applications:**

1. Duly qualified candidate shall apply therewith certified copies of the certificates/mark-sheets so as to the President of the Trust, on the above address before 30 days from the date of publication of the advertisement in newspaper.
2. Candidates already employed shall apply through proper channel and shall submit 'NO OBJECTION CERTIFICATE' from the present employer along with the application and also bring the same at the time of interview.

**Sangramsinh Jaysinh Mohite Patil**
**President**
**Shikshan Prasarak Mandal, Akluj Tal.Malshiras**
**Dist.Solapur Pin.413101**

पुण्यनगरी
सोलापूर
शुक्रवार,४ ऑक्टोबर २०२४

# युवा महोत्सव २०२४

२० वा युवा महोत्सव २०२४

उन्मेष सृजनरंगाचा दि. १ ते ४ ऑक्टोबर २०२४

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA
Akluj
Dist. Solapur
413101

## निर्मिती चित्रातून वृक्ष लागवड करा, गड किल्ल्यांचे संवर्धन करण्याचा संदेश

आणि पर्यावरण, महाराष्ट्रातील, गड किल्ले, धर्मस्थळे, भारतीय संविधान जोपासणे असे अनेक संदेश विद्यार्थ्यांनी दिले. शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय अकलूज येथील प्रेरणा गायकवाड, सयाजी मगर, प्रियंका धायंजे, मोतीराम वाघमोडे या विद्यार्थ्यांनी निर्मिती चित्रातून साखर कारखान्याच्या प्रतिकृतीतून औद्योगिकीकरणामुळे आपला देश पुढे जात आहे पण प्रदूषणामुळे आपले आरोग्य आणि पर्यावरण धोक्यात येत आहे. प्रदूषण थांबवून सांडपाण्याची विल्हेवाट कशी करावी, बंदिस्त इथेनॉल निर्मिती व्यवस्था कारखान्याने करावी. कारखान्याचे सांडपाणी नदीला जाणे थांबवावे हा संदेश निर्मिती चित्रातून देण्यात आला.

सोलापुरातील कस्तुरबाई महाविद्यालयातील संदीप गायकवाड, स्नेहा विरणे, सौरभ कोल्हे, वेनला ओडीशेरला या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूपासून ग्लोबल वॉर्मिंगचा धोका, सध्या पृथ्वीवर तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. पृथ्वीवरील वाढणारे तापमान कमी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करत वृक्षाची जोपासना करावी. प्लास्टिकचा वापरही टाळावा, माळढोक पक्षी वाचला पाहिजे. याच्या परिणामामुळे वाळवंट बनल्याचे चित्रनिर्मितीतून दाखवत माळढोक पक्षी वाचवाचा संदेश देण्यात आला होता. तर मानवाला ऑक्सिजन मास्क लावल्याचे चित्र निर्मितीतून दाखवले होते. असेंट महाविद्यालय कंदलगाव येथील विद्यार्थ्यांनी विशाळगड किल्ल्याचे चित्र निर्मिती करत महाराष्ट्रातील संस्कृती जपून गड किल्ल्याचे रक्षण करत स्वच्छता ठेवावी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांची प्रेरणा घ्यावी, असा संदेश यातून दिला होता. यावेळी पर्यवेक्षक डॉ. शिरीष आंबेकर, डॉ. संजय भारती, चारुदल पांडे यांची उपस्थिती होती.

सुराज्य सोलापूर

बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA
Akluj
Dist. Solapur
413101



माळीनगर : युवा महोत्सवातील यशवंत विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील पदाधिकारी.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे युवा महोत्सवात यश

**माळीनगर** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा उन्मेश सृजनरंग युवा महोत्सव वडाळा येथील लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये पार पडला. महोत्सवामध्ये अकलूज (ता. माळशिरस) येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयाने वक्तृत्व (मराठी) वैयक्तिक कलाप्रकारात प्रेरणा गायकवाड व शास्त्रीय तालवाद्य वैयक्तिक कला प्रकारात प्रसाद सुळ यांनी अनुक्रमे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. विद्यार्थ्यांना नागनाथ साळवे, सुरज ननवरे, अंजनी कश्यप, कृष्णा जगताप या माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक जेष्ठ संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संघ व्यवस्थापक डॉ. चंद्रशेखर ताटे-देशमुख, डॉ. सुधा बनसोडे, डॉ. सविता सातपुते, डॉ. अश्विनी रेळेकर यांनी युवा महोत्सवासाठी परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर
सोमवार, दि. १४ ऑक्टोबर २०२४

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA Akluj Dist. Solapur 413101

## संक्षिप्त वृत्त



अकलूजः अभिरूप ससंद उपक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. विश्वनाथ आवड.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात अभिरूप ससंद उपक्रम

✔ **अकलूज** : शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात, राज्यशास्त्र विभागाच्यावतीने अभिरूप ससंद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणालीची माहिती देणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात सभापतीच्या निवडीपासून झाली. यानंतर राष्ट्रगीत गायन आणि सदस्यांचा शपथविधी सोहळा पार पडला. प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर तसेच इतर महत्त्वाचे विषयांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांची विचारसरणी व्यापक लोकशाहीवादी व्हावी, हा अभिरूप ससंद उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राजकीय, सामाजिक आणि आर्थिक मुद्द्यांवर सखोल विचार करण्याची क्षमता विकसित होते, असे प्रा. विश्वनाथ आवड यांनी यावेळी सांगितले.

**लोकमत**

सोलापूर, मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०२४

# शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज,
## ता.माळशिरस, जि. सोलापूर
फोन नं. (०२१८५) २२६४३३

संस्थेच्या अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये खालील शैक्षणिक पात्रतेच्या कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक व ग्रंथपालाच्या नेमणुका करावयाच्या आहेत.

| विभाग | रिक्त पद | संख्या | | शैक्षणिक पात्रता | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्णवेळ | एकूण | | |
| माध्यमिक विभाग | कनिष्ठ लिपीक | १५ | १५ | एसएससी/एचएससी/ कोणत्याही शाखेचा पदवीधर | एससी २, व्हीजेएनटी २ ओबीसी ३, ईडब्ल्यूएस २ एसईबीसी ३, ओपन १३ |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक | प्रयोगशाळा सहाय्यक | ९ | ९ | एसएससी/एचएससी/ कोणत्याही शाखेचा पदवीधर | |
| माध्यमिक विभाग | ग्रंथपाल | १ | १ | बी.लिब/एलटीसी | |

वेतन व सेवानियम महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याच्या नियमानुसार. तसेच कनिष्ठ लिपीक पदासाठी संगणक व टंकलेखन कोर्स आवश्यक तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे पूर्ण नाव, शैक्षणिक पात्रता, विषय, श्रेणी, जात, जात पडताळणी, अनुभव, सध्याचा व कायमचा पत्ता, फोन/मोबाईल नंबर इत्यादी तपशिलाचे स्वतःचे हस्ताक्षरातील अर्ज व अर्जासोबत शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीसह ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसात मा. अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज, मु. पो. सदुभाऊ चौक, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर पिन- ४१३१०१ या पत्त्यावर किंवा समक्ष संस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

**संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील**
अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज

**दैनिक दिव्य मराठी**

दिव्य मराठी. मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४

# शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज ता. माळशिरस जि.सोलापूर
फोन नं. (०२१८५) २२६४३३

संस्थेच्या अनुदानित माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये खालील शैक्षणिक पात्रतेच्या कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक व ग्रंथपालाच्या नेमणूका करावयाच्या आहेत.

| विभाग | रिक्त पद | संख्या | | शैक्षणिक पात्रता | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्णवेळ | एकूण | | |
| माध्यमिक विभाग | कनिष्ठ लिपीक | १५ | १५ | एस.एस.सी. / एच.एस.सी. कोणत्याही शाखेचा पदवीधर | एससी २, व्हिजेएनटी २, ओबीसी ३, ईडब्ल्यूएस २, एसईबीसी ३, ओपन १३ |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक | प्रयोगशाळा सहाय्यक | ९ | ९ | एस.एस.सी. / एच.एस.सी. कोणत्याही शाखेचा पदवीधर | |
| माध्यमिक विभाग | ग्रंथपाल | १ | १ | बी.लिब./ एलटीसी | |

वेतन व सेवानियम महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याच्या नियमानुसार. तसेच कनिष्ठ लिपिक पदासाठी संगणक व टंकलेखन कोर्स आवश्यक तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी त्यांचे पूर्ण नांव, शैक्षणिक पात्रता, विषय, श्रेणी, जात, जात पडताळणी, अनुभव, सध्याचा व कायमचा पत्ता, फोन / मोबाईल नंबर इत्यादी तपशिलाचे स्वतःचे हस्ताक्षरातील अर्ज व अर्जासोबत शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतीसह ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसात **मा. अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज मु. पो. सदुभाऊ चौक, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर पिन ४१३१०१** या पत्त्यावर किंवा समक्ष संस्था कार्यालयाकडे पाठवावेत.

**संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील**
अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज

तरुण भारत संवाद क्रीडा बुधवार, १६ ऑक्टोबर २०२४

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA
Akluj
Dist. Solapur
413101

# युवा महोत्सवात शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे यश

प्रतिनिधी
अकलूज

पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा उन्मेष सृजनरंग युवा महोत्सव वडाळा येथील लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये नुकताच पार पडला. या युवा महोत्सवामध्ये शंकरराव मोहिते महाविद्यालयाने वक्तृत्व (मराठी) वैयक्तिक कला प्रकारामध्ये प्रेरणा गायकवाड व शास्त्रीय तालवाद्य वैयक्तिक कला प्रकारामध्ये प्रसाद सुळ यांनी अनुक्रमे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

या विद्यार्थ्यांना नागनाथ साळवे, सुरज ननवरे, अंजनी कश्यप, कृष्णा जगताप या माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक ज्येष्ठ संचालक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**अकलूज : युवा महोत्सवातील यशस्वी शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे विद्यार्थी.**

संघ व्यवस्थापक डॉ. चंद्रशेखर ताटे-देशमुख, डॉ. सुधा बनसोडे, डॉ. सविता सातपुते, डॉ. अश्विनी रेळेकर यांनी युवा महोत्सवासाठी परिश्रम घेतले.

जनमत सर्वसामान्यांचे

मंगळवार,दि.२२ ऑक्टोबर २०२४

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA Akluj Dist. Solapur 413101

# अकलूज येथील श्री.गणपती मंदिरात अथर्वशीर्षाचे सहस्र आवर्तन अभिषेक



संग्रामनगर दि.२१ (प्रतिनिधी)- येथील ब्राह्मण सेवा संघ व गणपती मंदिर ट्रस्टच्या वतीने संकष्टी चतुर्थीचे औचित्य साधून अथर्वशीर्षाचा सहस्र आवर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अकलूज येथील पेशवे कालीन पुरातन गणेश मंदिरात हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी उपस्थित ब्रह्मवृंदाने अथर्वशीर्षाचे सहस्र आवर्तन पठन केले. या कार्यक्रमासाठी जयसिंह मोहिते पाटील, किशोरसिंह मानेपाटील, धनंजय देशमुख,डॉ.अभिजीत बडवे, डॉ.कांचन कुलकर्णी,उदय टेके, शंकरराव देशपांडे,जगन्नाथ अनगळ, सुरेश देशपांडे,ड. प्रमोद कुलकर्णी,उद्योजक ज्ञानेश कुलकर्णी यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. उपस्थित भक्तांना ट्रस्टच्या वतीने दूध, केळी व मोदकाचा प्रसाद देण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष शिरीष देशपांडे,उपाध्यक्ष हरिकाका कुलकर्णी,प्रसाद कुलकर्णी,श्रीधर कुलकर्णी, प्रेमनाथ रामदासी,वैभव आंबेकर, विनायक फडणीस, गणेश कुलकर्णी, संतोष मुदगल , प्रमोद इनामदार,प्रसाद भागवत, नितीन रामदासी,

अकलूज येथील पुरातन गणेश मंदिर हे पेशवेकालीन मंदिर असून अकलूजमधील भाविकांचे ते श्रद्धास्थान आहे.नवसाला पावणारा गणपती अशी भाविकांची धारणा असल्याने इथे भक्तांची सतत दर्शनासाठी गर्दी असते.सध्या या मंदिराचा सभामंडप जीर्ण झाल्याने त्याचा जीर्णोद्धार होणे आवश्यक आहे.लोक वर्गणीतून हे काम पुर्ण करावे.त्यासाठी लागले ते सहकार्य करण्यात येईल.

**-जयसिंह मोहिते-पाटील,**
चेअरमन,सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील
सहकारी साखर कारखाना शंकरनगर अकलूज

मनोज देशपांडे, अवधूत शेकदार, जयेश कुलकर्णी, महेंद्र जोशी, गणेश बनाळीकर, संतोष अनगळ,राहूल भागवत आदींनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी वैशाली कांडलकर, वैशाली कुलकर्णी, सुप्रिया मुदगल,श्रेया कुलकर्णी, मेघा कुलकर्णी यांच्यासह बहुसंख्य समाजबांधव उपस्थित होते.

जनमत सर्वसामान्यांचे शनिवार, दि.०४ जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj 413101 *

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमास शंकरराव मोहिते महाविद्यालयात प्रारंभ



अकलूज, दि.०३ (प्रतिनिधी)- अलीकडच्या काळात तरुण वाचक वाचन संस्कृती पासून दुरावत चालला आहे. त्यामुळे तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करून, तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण आणि सामाजिक प्रबोधन होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठे, महाविद्यालये यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची वाचन संस्कृती वाढविण्याकरता विविध उपक्रम राबवण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम दरवर्षी ०१ ते १५ जानेवारी या दरम्यान वाचन पंधरावडा राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत शंकराव मोहिते महाविद्यालय अकलूज येथील ग्रंथालयाने प्रारंभी मंगळवार दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी मराठी कथा व कादंबरी या पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राचार्य डॉ. एस. के.टिळेकर ग्रंथपाल डी. एस. पाटील व इतर प्राध्यापक वृंद व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी/विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी ग्रंथालयाचे विभागप्रमुख प्रा. डी. एस. पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमाचे महत्व पटवून दिले. जवळपास १२५ ते १५० विद्यार्थ्यांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली. तसेच बुधवार दिनांक १ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथालयात असलेल्या दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन देखील यावेळी भरवण्यात आले होते. त्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. के. ए. आर बाबर व इतर प्राध्यापक उपस्थित होते. या दुर्मिळ ग्रंथांमध्ये ऐतिहासिक संदर्भ व इतर पुस्तकांची मांडणी केली होती. या दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शनास सुमारे ८० ते ९० विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकाने भेट दिली.

याबरोबर शुक्रवार दिनांक ३ जानेवारी रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांनी निवडलेल्या आवडीच्या पुस्तकांचे सामूहिक वाचन हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाचे प्रस्ताविक मराठी विषयाचे प्रा. व्ही. बी. सूर्यवंशी सर यांनी केले. मा . प्राचार्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून वाचनाचे महत्त्व पटवून दिले. यांनी केले. सामूहिक वाचन या उपक्रमामध्ये जवळजवळ १३७ मुलानी आपला सहभाग नोंदवला होता यानंतर सोमवार दिनांक ६ जानेवारी रोजी वाचन कौशल्य कार्यशाळा अंतर्गत निरंतर वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके वाचावीत आणि कशी वाचावीत याबद्दल प्राध्यापक विष्णू सुर्वे सर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच दुपारच्या सत्रात वाचन संवाद या उपक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये स्थानिक लेखक श्री. ता. सा. बावळे आणि विद्यार्थी वाचक यांच्यामधील परिसंवादाचे आयोजन केले आहे. यामुळे लेखकास प्रोत्साहन नव साहित्यांची ओळख होण्यास मदत होईल. यावेळी १६ जानेवारीला राबविल्या जाणाऱ्या पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थिनींची नाव नोंदणी करून घेतली जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडून त्यांच्या आवडीच्या पुस्तकांची निवड करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत आणि विद्यार्थी निवडलेल्या पुस्तकाचे सखोल वाचन करून त्यांच्या आकलनाप्रमाणे वाचलेल्या पुस्तकावर समीक्षणात्मक परीक्षण ५०० शब्दात परीक्षण मिनिटांसाठी परीक्षकांसमोर कथन/ सादरीकरण करून घेतले जाणार आहे. यातून तीन उत्कृष्ट व दोन उत्तेजनार्थ निबंधाचे व कथानकाची निवड करून विजेत्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व बक्षीस देण्यात येणार आहे आणि स्पर्धेतील विजेत्या परीक्षण निबंधांचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक शिवामृत नियतकालिकामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. या पद्धतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम महाविद्यालयात साजरा करण्यात येणार आहे. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर, ग्रंथपाल प्रा. डी. एस. पाटील सर्व प्राध्यापक आणि ग्रंथालयातील कर्मचारी श्री. डी. डी. सुर्वे सहा. ग्रंथपाल, श्री. आय. बी. शेख, राहुल जाधव आणि बापू चव्हाण हे ग्रंथालय परिचर हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. या अभिनव उपक्रमात महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने

सुराज्य
सोलापूर
रविवार, दि. ५ जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101



अकलूज : संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाप्रसंगी प्रा. विष्णू सुर्वे, प्रा. डॉ. एस. के.टिळेकर,ग्रंथपाल डी. एस. पाटील व इतर.

# अकलूज येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम

**अकलूज** : शंकराव मोहिते महाविद्यालयात संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला. प्रारंभी मराठी कथा व कादंबरी या पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन आयोजत करण्यात आले होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा. विष्णू सुर्वे यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. एस. के.टिळेकर,ग्रंथपाल डी. एस. पाटील विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रा. डी. एस. पाटील यांनी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभिनव उपक्रमाचे महत्व पटवून दिले. ६ जानेवारी रोजी वाचन कौशल्य कार्यशाळा अंतर्गत निरंतर वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके वाचावीत आणि कशी वाचावीत याबद्दल प्रा. सुर्वे सर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच दुपारच्या सत्रात 'वाचन संवाद' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. १६ जानेवारीला पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा आयोजली आहे. यासाठी उपक्रमासाठी प्रा.टळेकर, ग्रंथपाल प्रा. पाटील सर्व प्राध्यापक, कर्मचारी डी. डी. सुर्वे, आय. बी. शेख, राहुल जाधव आणि बापू चव्हाण परिश्रम घेत आहेत.

क्रीडासंचार
सोलापूर, सोमवार, ६ जानेवारी २०२५ संचार

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413101

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमास मोहिते महाविद्यालयात प्रारंभ

**संचार वृत्तसेवा**

**अकलूज, दि. ५-** अलीकडच्या काळात तरुण वाचक वाचन संस्कृतीपासून दुरावत चालला आहे. त्यामुळे तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करून, तरुणांच्या व्यक्तिमत्वाचे भरणपोषण आणि सामाजिक प्रबोधन होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विद्यापीठे, महाविद्यालये यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची वाचन संस्कृती वाढविण्याकरिता विविध उपक्रम राबवण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम दरवर्षी १ ते १५ जानेवारी या दरम्यान राबवला जातो. यास शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात प्रारंभ करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत मोहिते महाविद्यालय अकलूज येथील ग्रंथालयाने प्रारंभी मराठी कथा व कादंबरी या पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. याचे उद्घाटन महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक विष्णू सुर्वे यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर, ग्रंथपाल डी. एस. पाटील व इतर प्राध्यापक वृंद व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी ग्रंथालयाचे विभागप्रमुख प्रा. डी. एस. पाटील यांनी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने वाचन संकल्प महाराष्ट्राच या अभिनव उपक्रमाचे महत्त्व पटवून दिले. जवळपास १२५ ते १५० विद्यार्थ्यांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली.

१ जानेवारी रोजी ग्रंथालयात असलेल्या दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर यांनी केले. ३ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांनी निवडलेल्या आवडीच्या पुस्तकांचे सामूहिक वाचन हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाचे प्रस्ताविक मराठी विषयाचे प्रा. व्ही. बी. सूर्यवंशी यांनी केले. या उपक्रमात १३७ मुलांनी आपला सहभाग नोंदवला होता. सोमवार, ६ रोजी वाचन कौशल्य कार्यशाळा अंतर्गत निरंतर वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके वाचावीत आणि कशी वाचावीत याबद्दल प्रा. विष्णू सुर्वे मार्गदर्शन करणार आहेत.

संचार सुप्रभात
सोलापूर, गुरुवार, ९ जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101



# जातीपातीचा विचार न करता महापुरुषांची चरित्रे वाचा : प्रा. सुर्वे

## अकलूज येथे वाचन कौशल्य कार्यशाळा संपन्न

**अकलूज, दि. ८-**
शेतकरी जसा शेतीची मशागत करतो तशीच पुस्तके मन आणि मेंदूची मशागत करतात. कारण न वाचणाऱ्या व्यक्तींचे मन आणि मेंदू पडीक जमिनीसारखे अविकसित राहतात. म्हणून वाचकांनी सर्व क्षेत्रात यशस्वी झालेल्या महापुरुषांची चरित्रे कोणत्याही जातीपातीचा विचार न करता वाचावीत. त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास होतो असे मत इंग्रजी विभागाचे प्रा. विष्णू सुर्वे यांनी व्यक्त केले.

ग्रंथालयाने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्यावतीने राबवित असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रम अंतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा या उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस. के. टिळेकर, आय.क्यू.ए.सी.चे समन्वयक डॉ. एस. एस. देवकर, ग्रंथालय विभागप्रमुख डी. एस. पाटील, लेखक ता. सा. बावळे, डॉ. व्ही. एम. आवड उपस्थित होते.

प्रा. सुर्वे पुढे म्हणाले की, शारीरिक व्यायाम शरीराच्या आरोग्यासाठी जसा केला जातो तसा पुस्तकांचे वाचन मनाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतो. तसेच दलित आत्मकथने वाचत असताना त्यांची दुःखे व समस्या पाहता आपल्या आयुष्यात येणारी दुःखे काहीच नाहीत. या देशात सर्व क्षेत्रात मोठी झालेली माणसे उत्तम वाचक होते म्हणून ते यशस्वी झाले असे सांगितले. तसेच दुसऱ्या सत्रात लेखक व वाचक सुसंवाद या उपक्रमांतर्गत कथाकार असलेले ता. सा. बावळे यांनी, कथालेखन करत असताना समाजात पाहिलेली विविध वृत्तींची व प्रवृत्तीची माणसे कथा लेखनासाठी उपयुक्त पडतात तसेच आजचा चांगला वाचक हा उद्याचा चांगला लेखक होऊ शकतो. कारण लेखनाची बीजे वाचनातून सापडतात, म्हणून वाचकाने जास्तीतजास्त पुस्तकांचे वाचन केले पाहिजे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर यांनी केले. यावेळी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी ग्रंथालयास आठ पुस्तके भेट दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे डॉ. जे. डी. परकाळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. एन. टी. लोखंडे यांनी करून दिली तर आभार डॉ. सी. बी. लोंढे यांनी मानले. उपक्रम यशस्वी होण्यासाठी डी. डी. सुर्वे, आय. बी. शेख, राहुल जाधव, बापू चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी
सोलापूर । शुक्रवार,१० जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj 413101

# मन आणि मेंदूच्या मशागतीसाठी वाचनाची गरज : प्रा.विष्णू सुर्वे

**अकलूज / प्रतिनिधी**

शेतकरी जसा शेतीची मशागत करतो तसे पुस्तक हे मन आणि मेंदूची मशागत करते. मानासांनी सर्व क्षेत्रात यशस्वी झालेल्या महापुरुषांची चरित्रे वाचावीत. त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास होतो असे मत प्रा.विष्णू सुर्वे यांनी व्यक्त केले.

शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने राबवित असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.एस.के. टिळेकर हे होते.

यावेळी आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. एस.एस. देवकर, ग्रंथालय विभाग प्रमुख डी. एस. पाटील, लेखक ता.सा. बावळे, डॉ.व्ही. एम. आवड व इतर प्राध्यापक उपस्थित होते. दुसऱ्या सत्रात लेखक व वाचक सुसंवाद या उपक्रमांतर्गत कथाकार ता. सा. बावळे यांनी वाचकांशी सुसंवाद साधला. प्राचार्य डॉ.एस.के. टिळेकर म्हणाले, वाचकानी वाचनाची विविध कौशल्य अंगी जोपासली पाहिजेत. तरच आजचा वाचक आपल्या कौशल्याच्या जोरावर उद्याचा उत्कृष्ट लेखक व चांगला वाचक होऊ शकतो.

यावेळी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रा.सोमनाथ चव्हाण यांनी ग्रंथालयास आठ पुस्तके भेट दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे डॉ.जे.डी. परकाळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ.एन.टी. लोखंडे यांनी करून दिली तर आभार डॉ.सी.बी. लोंढे यांनी मांडले. या उपक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा अभिनव उपक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयातील कर्मचारी डी.डी. सुर्वे सहा. ग्रंथपाल, आय.बी. शेख, राहुल जाधव आणि बापू चव्हाण तसेच प्रबंधक राजेंद्र बामणे आणि कार्यालय अधीक्षक मालुसरे यांनी परिश्रम घेतले.

सुराज्य सोलापूर

शनिवार, दि. १५ फेब्रुवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya, Akluj 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सवास प्रारंभ

अकलूज : अकलूज येथे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात 'सृजनरंग' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.या महोत्सवाचे उद्घाटन युवानेते सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.हा महोत्सव २१ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना सयाजीराजे मोहिते-पाटील म्हणाले की,महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थींना अभ्यासाबरोबर खेळाचे देखील ही महत्व दिल्यामुळे यातून उदयमुख खेळाडू निर्माण होतील. प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या विकासाचा चौफेर आढावा घेतला. या सृजनरंग महोत्सवामध्ये महाविद्यालयातील आर्ट्स, कॉमर्स, सायन्स वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. सुरुवातीच्या दिवशी बॉक्स



सृजनरंग महोत्सवात क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना सयाजीराजे मोहिते.

क्रिकेट क्रिकेटच्या मॅचेस घेण्यात आल्या.या स्पर्धेचे समालोचन व्यवसाय अभ्यासक्रमाचे प्रा.जयंत माने यांनी केले.यानंतर या महोत्सवामध्ये . मोबाईल फोटोग्राफी,मेहंदी स्पर्धा,निबंध स्पर्धा,लेखन स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये प्रत्येक संघासाठी महाविद्यालयातील शिक्षक संघ व्यवस्थापक म्हणून नेमण्यात आले असून या प्रत्येक स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी महाविद्यालय बाहेरील परीक्षक नेमण्यात आले आहेत. स्पर्धेसाठी प्रमुख डॉ. विश्वनाथ आवड तसेच प्राध्यापक, कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

जनमत सर्वसामान्यांचे

शनिवार, दि.१५ फेब्रुवारी २०२५

Shankar... Akluj 413101 ... Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सवास शुभारंभ



संग्रामनगर दि.१४ (प्रतिनिधी)- अकलूज येथे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.या महोत्सवाचे उद्घाटन युवानेते सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.हा महोत्सव १४ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून यामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना सयाजीराजे मोहिते-पाटील म्हणाले की,महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थींना अभ्यासाबरोबर खेळाचे देखीला ही महत्व दिले असल्यामुळे यातून उदयमुख खेळाडू निर्माण होतील.सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर यांनी प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या विकासाचा चौफेर आढावा घेतला.

या सृजनरंग महोत्सवामध्ये महाविद्यालयातील आर्ट्स, कॉमर्स,सायन्स वर्गातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.आज सुरुवातीच्या दिवशी बॉक्स विकेट क्रिकेटच्या मॅचेस घेण्यात आल्या.या स्पर्धेचे समालोचन व्यावसाय अभ्यासक्रमाचे प्रा.जयंत माने यांनी केले.यानंतर या महोत्सवामध्ये मोबाईल फोटोग्राफी,मेहंदी स्पर्धा,निबंध स्पर्धा,लेखन स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धामधून विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह असल्याचे दिसून येत आहे.या स्पर्धेमध्ये प्रत्येक संघासाठी महाविद्यालयातील शिक्षक संघ व्यवस्थापक म्हणून नेमण्यात आले असून या प्रत्येक स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी महाविद्यालय बाहेरील परीक्षक नेमण्यात आले आहेत.या स्पर्धा पाहण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होत आहे. या स्पर्धा पार पडण्यासाठी सृजनरंग महोत्सवाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ आवड तसेच सर्व स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,प्रशासकीय वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेत आहेत.

पुढारी | रविवार, १६ फेब्रुवारी २०२५

Shankarrao ... Vidyalaya Library Akluj 413101




अकलूज : सयाजीराजे मोहिते-पाटील यांचा सन्मान करताना मान्यवर.

# अकलूज येथे सृजनरंग महोत्सवाचे आयोजन

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षण प्रसारक मंडळाच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात दि. १४ ते २१ फेब्रुवारी या कालावधीत सृजनरंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्‌घाटन युवानेते सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयात शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव व प्रोत्साहन मिळावे. या हेतूने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये बॉक्स विकेट क्रिकेट स्पर्धा (मुले व मुली), व्हिडीओ रिल मेकिंग (तयार करणे) स्पर्धा, मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा, मेहेंदी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा, प्रेझेंटेशन स्पर्धा आदींचा समावेश आहे.

सुराज्य सोलापूर

गुरुवार, दि. २० मार्च २०२५

# सहकार महर्षींच्या कार्याचा महिमा सर्वदूर पोहोचला पाहिजे

## कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांचे प्रतिपादन

अकलूज/प्रतिनिधी

सर्वसामान्य माणसांच्या उद्धारासाठी सहकाराच्या माध्यमातून उदरनिर्वाहाची अनेक साधने सहकार महर्षींनी निर्माण केली व अनेकांचे आयुष्य उजळवून टाकले. सहकार सहकार महर्षींच्या कार्याची ओळख ही विद्यापीठातील प्रत्येक महाविद्यालयात पोहोचवली पाहिजे. त्यांच्या कार्याचा महिमा या व्याख्यानमालेच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचला पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांनी केले.

सोलापूर विद्यापीठ व अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेचे सातवे पुष्प गुंफताना प्रा.डॉ.प्रकाश महानवर बोलत होते. यावेळी साहित्यिक आप्पासाहेब खोत उपस्थित होते. प्रा.आप्पासाहेब खोत म्हणाले की, राज्यात सहकार चळवळ कशी रुजली व सहकार चळवळीतून माळशिरसच्या माळरानावर हरितक्रांती व धवलक्रांती सहकार महर्षींनी फुलविली. त्यांच्या विशाल दृष्टिकोनातून समृद्धीची व संपन्नतेची शिखरे पादाक्रांत करीत असताना नवमहाराष्ट्र घडविण्याची मुहूर्तमेढ रोवली. मातीत रमणाऱ्या माणसाची माती होऊ नये हे जाणणारे, माणसांना सहकाराच्या माध्यमातून जगण्याचा विचार देणारे व अनेक संकटांशी सामना करत लोकांच्या भविष्याचा विचार करणारे सहकार महर्षी हे दूरदृष्टी नेते होते. या व्याख्यानमालेसाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.देवानंद चिलवंत, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक विनोदकुमार दोशी, कुलसचिव डॉ.योगिनी घारे, वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाचे प्रभारी संचालक डॉ. राजीवकुमार मेंते, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.वनिता सावंत यांनी केले तर आभार डॉ.जयश्री मुंडेवाडीकर यांनी मानले.



अकलूज : सहकार महर्षींच्या प्रतिमेच्या पूजनाप्रसंगी कुलसचिव डॉ.योगिनी घारे, डॉ. अप्पासाहेब खोत, कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर व इतर.

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA Akluj Dist. Solapur 413101

जनमत सर्वसामान्यांचे

गुरूवार,दि.२० मार्च २०२५

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA Akluj Dist. Solapur 413101

# सहकार महर्षींनी सहकारातून नवमहाराष्ट्र घडविला : प्रा.आप्पासाहेब खोत





संग्रामनगर दि.१९ (प्रतिनिधी)- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेचे सातवे पुष्प गुंफताना साहित्यिक आप्पासाहेब खोत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जीवनात साहित्य आणि वक्तृत्व यांचे स्थान या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर उपस्थित होते.

प्रा.आप्पासाहेब खोत यांनी सहकार महर्षींच्या जीवन व कार्याचा आढावा घेत.सांगितले की,महाराष्ट्रमध्ये सहकार चळवळ कशी रुजली व सहकार चळवळीतून माळशिरसच्या माळरानावर हरितक्रांती व धवलक्रांती फुलविणाऱ्या सहकार महर्षींच्या विशाल दृष्टिकोनातून समृद्धीची व संपन्नतेची शिखरे पादाक्रांत करीत असताना.नवमहाराष्ट्र घडविण्याची मुहूर्तमेढ रोवल्याचे स्पष्ट केले.मातीत रमणाऱ्या माणसाची माती होऊ नये हे जाणणारे,माणसांना सहकाराच्या माध्यमातून जगण्याचा विचार देणारे व अनेक संकटांशी सामना करत लोकांच्या भविष्याचा विचार करणारे सहकार महर्षी हे दूरदृष्टी नेते होते,असे विचार त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कुलगुरू महानवर म्हणाले की,सर्वसामान्य माणसांच्या उद्धारासाठी सहकाराच्या माध्यमातून उदरनिर्वाहाची अनेक साधने सहकार महर्षींनी निर्माण केली व अनेकांचे आयुष्य उजळवून टाकले.महाराष्ट्रामध्ये सहकारातील अनेक प्रयोग हे माळशिरस तालुक्यात यशस्वीपणे राबविले व त्यातून क्रांती केली.सहकार सहकार महर्षींच्या कार्याची ओळख ही विद्यापीठातील प्रत्येक महाविद्यालयात व्याख्यानाच्या माध्यमातून पोहोचवली पाहिजे व सहकार महर्षींच्या कार्याचा महिमा या व्याख्यानमालेच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचला पाहिजे.असे मत व्यक्त केले.

या सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेसाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.देवानंद चिलवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक विनोदकुमार दोशी,कुलसचिव डॉ.योगिनी घारे,वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाचे प्रभारी संचालक डॉ. राजीवकुमार मेंते,शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सणस,उत्कर्ष शेटे,वसंत जाधव,रामचंद्र गायकवाड,शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर,रसायन शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. अनिल घनवट,उपकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे,उपकुलसचिव डॉ. सूर्यकांत कांबळे,प्रशांत चोरमले, डॉ.वर्षा भोसले, सोलापूर जिल्ह्यातील साहित्यिक इंद्रजीत घुले,शिवाजी बागल,अनंत पाटील संकुलाच्या समन्वयक डॉ. वनिता सावंत,डॉ.रश्मी दातार, डॉ. इम्तियाज सय्यद,डॉ.विघ्नेश नादरगी,डॉ.जयश्री मुंडेवाडीकर, प्रा.मुग्धा जगदाळे,प्रा.वनिता सोनवणे,प्रा.सौजन्या घंटे तसेच शिक्षण प्रसारक मंडळातील शाखाप्रमुख,शिक्षक,पत्रकार, विद्यापीठातील अधिकारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.वनिता सावंत यांनी केले तर आभार डॉ. जयश्री मुंडेवाडीकर यांनी मानले.

पुण्य नगरी
सोलापूर । गुरूवार, २० मार्च २०२५

# सहकार महर्षींनी सहकारातून नवमहाराष्ट्र घडविला : प्रा. खोत

## अकलूज येथे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमाला



अकलूज / प्रतिनिधी

मातीत रमणाऱ्या माणसाची माती होऊ नये हे जाणणारे, माणसांना सहकाराच्या माध्यमातून, जगण्याचा विचार देणारे व अनेक संकटांशी सामना करत लोकांच्या भविष्याचा विचार करणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील हे दूरदृष्टीचें नेते होते. त्यांनी सहकारातून नवमहाराष्ट्र घडविला, असे मत प्रा. आप्पासाहेब खोत यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेचे सातवे पुष्प गुंफताना साहित्यिक आप्पासाहेब खोत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जीवनात साहित्य आणि वक्तृत्व यांचे स्थान या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.प्रकाश महानवर उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कुलगुरू महानवर म्हणाले, सर्वसामान्य माणसांच्या उद्धारासाठी सहकाराच्या माध्यमातून उदरनिर्वाहाची अनेक साधने सहकार महर्षींनी निर्माण केली व अनेकांचे आयुष्य उजळवून टाकले. सहकारातील अनेक प्रयोग हे माळशिरस तालुक्यात यशस्वीपणे राबविले व त्यातून क्रांती केली.

या सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेसाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक विनोदकुमार दोशी, कुलसचिव डॉ.योगिनी घारे, वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाचे प्रभारी संचालक डॉ.राजीवकुमार मेंते, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक बाळासाहेब सणस, उत्कर्ष शेटे, वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड, शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर, रसायन शास्त्र संकुलाचे संचालक डॉ.अनिल घनवट, उपकुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे, उपकुलसचिव डॉ.सूर्यकांत कांबळे, प्रशांत चोरमले, डॉ.वर्षा भोसले, साहित्यिक इंद्रजीत घुले, शिवाजी बागल, अनंत पाटील संकुलाच्या समन्वयक डॉ.वनिता सावंत, डॉ. रश्मी दातार, डॉ.इम्तियाज सय्यद, डॉ. विघ्नेश नादरगी, डॉ.जयश्री मुंडेवाडीकर, प्रा.मुग्धा जगदाळे, प्रा.वनिता सोनवणे, प्रा.सौजन्या घंटे तसेच शिक्षण प्रसारक मंडळातील शाखाप्रमुख, शिक्षक, पत्रकार, विद्यापीठातील अधिकारी वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.वनिता सावंत यांनी केले तर आभार डॉ.जयश्री मुंडेवाडीकर यांनी मानले.

तरुण भारत संवाद | क्रीडा | शनिवार ४ जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101

# शिक्षण प्रसारक मंडळातील शिक्षकांचा गौरव

**अकलूज :** महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षण संस्था म्हणून गौरवलेल्या शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज या संस्थेच्या विविध शाखेतील मुख्याध्यापक, शिक्षक व सेवक यांना महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने कृतिशील शाळा, शिक्षक व सेवक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

माजी आ. दत्तात्रय सावंत, सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकारी जगताप यांच्या हस्ते मोरजाई विद्यालय, मोरोची व कृष्णानंद विद्यामंदिर पाटीलवस्ती या शाळेस कृतिशील शाळा पुरस्कार, विजय उबाळे, दिलीप शिर्के यांना कृतिशील मुख्याध्यापक म्हणून तर बिभीषण जाधव, हनुमंत देवकते, कलावती पालवे, धनंजय जाधव, उमेश भिंगे यांना कृतिशील शिक्षक, उमेश भिंगे यांना कृतिशील क्रीडा शिक्षक आणि सादिक झारेकरी यांना कृतिशील लिपिक पुरस्कार, ज्ञानेश्वर शेलार यांना कृतिशील कला शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

जनमत सर्वसामान्यांचे

शनिवार, दि.०४ जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात महिला विषयक कायदे विषयावरील व्याख्यान संपन्न





संग्रामनगर दि.०३ (प्रतिनिधी)–अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून अंतर्गत तक्रार निवारण समिती, अँटी रॅगिंग समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला कायदेविषयक सल्ला' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डव्होकेट सौ. धनश्री रिसवडकर मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.टिळेकर हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी कै.शंकरराव मोहिते पाटील व कै.रत्नप्रभादेवी मोहिते पाटील तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे सौ.रिसवडकर मॅडम आपल्या भाषणात सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणातील योगदान या विषयी विचार मांडले. व त्यानंतर राज्यघटनेमध्ये महिलांविषयी असणाऱ्या कायद्यांची माहिती दिली. राज्यघटनेमध्ये अनेक कलमा पैकी त्यांनी कलम १४ ते ५० मधील सर्व कायदे उपस्थितांना सांगितले.यामध्ये महिलांना कामाच्या ठिकाणी संरक्षण कायदा, बालविवाह प्रतिबंधात्मक कायदा, मिळकतीतील हक्क कायदा, हिंदू विवाह कायदा, विशेष विवाह कायदा, समान वेतन कायदा अशा अनेक कायद्याविषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. यासाठी शासनाने महिला आयोगाची देखील स्थापना केल्याचे सांगितले.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.के. टिळेकर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सांगितले की, नैतिकतेचे धडे हे विद्यार्थ्यांना त्यांच्या घरातूनच मिळाले पाहिजेत घरातून मिळणाऱ्या शिक्षणावरच मुले पुढे अनुकरण करत असतात केवळ महिलासाठीच विशेष कायदे आहेत असं नाही तर पुरुषांना देखील कायद्यांची माहिती असावी या उद्देशाने या कार्यक्रमाच्या आयोजन महाविद्यालयात करण्यात आले आहे.आपण ज्या महाविद्यालयात शिक्षण घेता त्या ठिकाणी काही तक्रारी असल्यास विद्यार्थ्यांनी प्रशासनास तशा पद्धतीची माहिती द्यावी.आम्ही त्याचे निराकरण करू असे आव्हान केले.त्यासाठी त्यांनी निर्भया पथक, विशाखा समिती, दामिनी पथक अशा समित्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या कार्यक्रमासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ.सतीश देवकर अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. दमयंती कांबळे सचिव डॉ.सविता सातपुते अँटी रॅगिंग समितीचे प्रमुख डॉ. चंकेश्वर लोंढे महाविद्यालयातील डॉ.अश्विनी रेळेकर सिनियर व ज्युनियर विभागातील सर्व महिला प्राध्यापिका महाविद्यालयाचे प्रबंधक राजेंद्र बामणे कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.दमयंती कांबळे सूत्रसंचलन प्रा.स्मिता पाटील यांनी तर आभार डॉ.सविता सातपुते यांनी मानले.

दैनिक दिव्य मराठी
सोलापूर जिल्हा
सोलापूर, शनिवार, ४ जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj 413101 *

**कायदेविषयक शिबिर** • अकलूजच्या मोहिते विद्यालयात ॲड. रिसवडकर यांचे मार्गदर्शन

# सामाजिकदृष्ट्या सक्षम, होण्याकरिता महिलांपर्यंत कायद्याची माहिती पोहोचावी

## रॅगिंग समिती, गुणवत्ता हमी कक्षातर्फे जनजागृती उपक्रम

प्रतिनिधी | अकलूज

आज प्रत्येक क्षेत्रात महिलांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे . महिला अबला नाहीत त्या सबला आहेत. महिलांना सामाजिक दृष्ट्या सक्षम आणि संरक्षित करण्यासाठी कायद्याचेही मोठे कवच आहे . या कायद्यांची माहिती महिलांना पोहोचवण्यासाठी कायदेविषयक शिबिरांची नितांत गरज आहे, असे मत अकलूज येथील महिला विधिज्ञ नीता रिसवडकर यांनी व्यक्त केले .

येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात 'महिला कायदेविषयक सल्ला 'या विषयावर ॲड . नीता रिसवडकर यांचे व्याख्यान व्याख्यान आयोजित केले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या . क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून तक्रार निवारण समिती , रॅगिंग समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ' महिला कायदेविषयक सल्ला ' या विषयावर ॲड. नीता रिसवडकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .

आपल्या देशात महिलांना कायद्याचे कवच देण्यासाठी व्यापक असे कायदे अस्तित्वात आहेत, परंतु दुर्दैवाने अनेक महिलांना त्या संदर्भातील माहिती उपलब्ध होत नाही, अशी खंत ॲड. नीता रिसवडकर यांनी व्यक्त केली .महिलांना त्यांच्या कामांच्या ठिकाणी संरक्षण देणारा कायदा, बालविवाह प्रतिबंधात्मक कायदा, मिळकतीतील हक्क कायदा, हिंदू विवाह कायदा, विशेष विवाह कायदा,समान वेतन कायदा अशा अनेक कायद्याविषयी सविस्तर अशी माहिती ॲड . नीता यांनी विद्यार्थ्यांना सांगितली व अनेक न्याय निवाड्यांचे दाखले दिले .




अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात कायदेविषयक मार्गदर्शन करताना ॲड.नीता.रिसवडकर.

### निर्भया, विशाखा, दामिनी पथकाची दिली माहिती

यावेळी डॉ . एस . के . टिळेकर म्हणाले, नैतिकतेचे धडे विद्यार्थ्यांना घरातूनच मिळाले पाहिजेत. केवळ महिलांसाठीच विशेष कायदे आहेत असं नाही, तर पुरुषांनाही कायद्याची माहिती असावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात केले आहे. महाविद्यालयात तक्रारी असल्यास विद्यार्थ्यांनी माहिती द्यावी. आम्ही त्याचे निराकरण करू, असे अवाहन केले. त्यांनी निर्भया पथक,विशाखा समिती, दामिनी पथक अशा समित्यांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या कार्यक्रमासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ. सतीश देवकर , अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. दमयंती कांबळे ,सचिव डॉ.सविता सातपुते अँटी रॅगिंग समितीचे प्रमुख डॉ. चंकेश्वर लोंढे महाविद्यालयातील डॉ. अश्विनी रेळेकर यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या .

जनमत सर्वसामान्यांचे

गुरूवार,दि.०९ जानेवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101

# मन आणि मेंदूच्या मशागतीसाठी वाचनाची गरज : प्रा.विष्णू सुर्वे

अकलूज, दि.०८ (प्रतिनिधी)- शेतकरी जसा शेतीची मशागत करतो तसे पुस्तके मन आणि मेंदूची मशागत करतो. कारण न वाचणाऱ्या व्यक्तीचे मन आणि मेंदू पडीक जमिनीसारखे अविकसित राहतो. म्हणून, वाचकांनी सर्व क्षेत्रात यशस्वी झालेल्या महापुरुषांची चरित्रे कोणत्याही जाती पातीचा विचार न करता वाचावीत त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास होतो असे मत इंग्रजी विभागाचे प्रा. विष्णू सुर्वे सर यांनी व्यक्त केले. ग्रंथालयाने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने राबवित असलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभिनव उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य कार्यशाळा या उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. एस. के. टिळेकर, आय क्यू ए सी चे समन्वयक डॉ. एस. एस. देवकर, ग्रंथालय विभाग प्रमुख डी. एस. पाटील, लेखक ता. सा. बावळे, डॉ. व्ही. एम आवड व इतर प्राध्यापक उपस्थित होते. ते आणखी पुढे म्हणाले की, शारीरिक व्यायाम शरीराच्या आरोग्यासाठी जसा केला जातो तसा पुस्तकांचे वाचन मनाच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतो तसेच दलित आत्मकथने वाचत असताना त्यांची दुःखे व समस्या पाहता आपल्या आयुष्यात येणारी दुःखे काहीच नाहीत व या देशात सर्व क्षेत्रात मोठी झालेली माणसे उत्तम वाचक होते म्हणून ते यशस्वी झाले. यावेळी प्रा. विष्णू सुर्वे सर यांनी यशवंतराव चव्हाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, महात्मा फुले इ. ची उदाहरणे दिली.

तसेच दुसऱ्या सत्रात लेखक व वाचक सुसंवाद या उपक्रमांतर्गत



कथाकार असलेले श्री ता. सा. बावळे यांनी वाचकांशी सुसंवाद साधला त्यावेळी बोलताना श्री. बावळे सर यांनी कथालेखन करत असताना समाजात पाहिलेली विविध वृत्तींची व प्रवृत्तीची माणसे कथा लेखनासाठी उपयुक्त पडतात तसेच आजचा चांगला वाचक हा उद्याचा चांगला लेखक होऊ शकतो कारण लेखनाची बीजे वाचनातून सापडतात म्हणून वाचकाने जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन केले पाहिजे असे पुढे ते म्हणाले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. टिळेकर सर यांनी वाचकांना संबोधित करताना म्हणाले की, वाचकानी वाचनाची विविध कौशल्य अंगी जोपासली पाहिजेत. तरच, आजचा वाचक आपल्या कौशल्याच्या जोरावर उद्याचा उत्कृष्ट लेखक व चांगला वाचक होऊ शकतो. यावेळी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रा. सोमनाथ चव्हाण यांनी ग्रंथालयास आठ पुस्तके भेट दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागाचे डॉ. जे. डी परकाळे सर यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. एन. टी. लोखंडे सर यांनी करून दिली तर आभार डॉ. सी. बी. लोंढे यांनी मांडले. या उपक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा अभिनव उपक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथालयातील कर्मचारी श्री. डी. डी. सुर्वे सहा. ग्रंथपाल, श्री. आय. बी. शेख राहुल जाधव आणि बापू चव्हाण तसेच प्रबंधक श्री. बामणे आणि कार्यालय अधीक्षक श्री मालुसरे परिश्रम घेतले.

जनमत सर्वसामान्यांचे

रविवार,दि.२३ फेब्रुवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj 413101 *

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सव संपन्न

संग्रामनगर दि.२२ (प्रतिनिधी)–अकलूज येथे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात ''सृजनरंग महोत्सव २०२५'' चे आयोजन करण्यात आले होते.शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील अध्यक्ष म संग्रामसिंह मोहिते पाटील यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात शिक्षणाबरोबर विद्यार्थीच्या सुप्त कलागुणांना वाव व प्रोत्साहन देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या सृजनरंग महोत्सवमध्ये बॉक्स विकेट क्रिकेट स्पर्धा (मुले व मुली),व्हिडिओ रिल मेकींग (तयार करणे) स्पर्धा,मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा,मेहेंदी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा,पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा,प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. हा महोत्सव दि.१४ फेब्रुवारी ते २१ फ ब्रुवारीपर्यंत या कालावधीत संपन्न झाला.यामध्ये एकू ३९७ स्पर्धक सहभागी झालेले होते.

या महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. हनुमंत अवताडे,डॉ. सतीश देवकर यांचे शुभहस्ते संपन्न झाला.पारितोषक वितरण वाचन महोत्सव समन्वयक डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले. सदर महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक ऑफिस स्टाफ शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.या पारितोषक वितरण समारंभाचे आभार प्रदर्शन डॉ. निवृत्ती लोखंडे यांनी मानले.

या स्पर्धेतील निकाल – बॉक्स विकेट क्रिकेट स्पर्धा मुले बी टीम बीएस्सी.भाग २ (प्रथम), बीकॉम भाग ३ (द्वितीय), बीकॉम.भाग१ टीम बी (तृतीय), बीकॉम भाग २ टीम ए,(तृतीय) मुली क्रिकेट स्पर्धा – बी.ए.भाग २ (प्रथम),बी.ए.भाग ३ (व्दितीय),बीएस्सी भाग ३ (तृतीय),बी.कॉम भाग १ (तृतीय) पेपर प्रेझेन्टेशन स्पर्धा – श्रावणी ढगे बी.कॉम २ (प्रथम), रुक्मिणी येल्गोंडे बीएस्सी ३ (व्दितीय),हितेश पुंज बी.कॉम ३ (तृतीय) प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धा – रुक्मिणी येल्गोंडे बीएस्सी ३ (प्रथम),द्वितीय क्रमांक गौरी कुल्धर्मे बीकॉम २ (व्दितीय), श्रावणी ढगे बी.कॉम २ (तृतीय) मेहंदी स्पर्धा – प्रथम क्रमांक साक्षी सावंत बी एस्सी ३ (प्रथम),प्राजक्ता यादव



बी.ए.भाग २ (व्दितीय),सानिया शेख बीकॉम २,सानिया मुलाणी बी.ए.२,वैष्णवी भोसले बी.एस्सी ३,खुशबू तांबोळी बी.ए.२ (तृतीय) वक्तृत्व स्पर्धा – हितेश पुंज बीकॉम ३ (प्रथम), दिव्या जाधव बी.एस्सी ३ (द्वितीय),निकिता चव्हाण बी एस्सी ३ (तृतीय) निबंध स्पर्धा – वैष्णवी शिंदे बी.कॉम ३ (प्रथम), आरती साठे बी.ए.१ (द्वितीय), प्राजक्ता यादव बी ए भाग २,प्राची शिंदे बीकॉम भाग ३ (तृतीय)) मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा – सानिया शेख बी.कॉम २ (प्रथम), साक्षी सावंत बीएस्सी ३ (द्वितीय),गौरी लोंढे बी.ए.१, योगेश तुपे बी.ए.भाग २ (तृतीय) रील मेकिंग सादरीकरण स्पर्धा – अलोक गौंडे बी कॉम १ (प्रथम), गौरी जडे बीएस्सी १ (द्वितीय), प्राची शिंदे बी.कॉम ३ (तृतीय)) उत्कृष्ट संघव्यवस्थापक – प्रा.विनायक माने (बी.कॉम) वर्गनिहाय सर्वसाधारण विजेतेपद – बीएस्सी भाग ३,विभाग निहाय सर्वसाधारण विजेतेपद – बी कॉम

पुढारी
MY सोलापूर
सोमवार, २४ फेब्रुवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413101 * Library

# अकलूज येथे सृजनरंग महोत्सवाची सांगता

## ३९७ स्पर्धकांनी सहभाग; वक्तृत्व स्पर्धेत हितेश पुंजने मिळवला प्रथम क्रमांक

**अकलूज : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षण प्रसारक मंडळाच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाने आयोजित केलेल्या सृजनरंग महोत्सवात बॉक्स विकेट क्रिकेट स्पर्धा, व्हिडीओ रिल मेकींग स्पर्धा, मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा, मेहंदी, वक्तृत्व, निबंध, पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट सादरीकरण करण्यात आले होते. यामध्ये एकूण ३९७ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या महोत्सवाची सांगता बक्षीस वितरणाने झाली.

शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी ज्येष्ठ संचालक जयसिंह मोहिते - पाटील व अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते - पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन केले होते. या



अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालयात महोत्सवातील विजेते व मान्यवर.

महोत्सवाचे पारितोषिक वितरण प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर, डॉ. हनुमंत अवताडे, डॉ. सतीश देवकर यांच्या हस्ते झाले. पारितोषिक वितरण वाचन महोत्सव समन्वयक डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले.

निकाल क्रिकेट स्पर्धा (मुले) प्रथम क्रमांक बी एस्सी भाग दोन, द्वितीय बीकॉम भाग तीन, तृतीय एस वाय बी कॉम. व एफ वाय बी कॉम. (मुली) प्रथम क्रमांक बी ए भाग दोन, द्वितीय टी वाय बी ए, टी वाय बी एस सी. पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा प्रथम श्रावणी ढगे, द्वितीय रुक्मिणी यलगोंडे, तृतीय हितेश पुंज. प्रोजेक्ट स्पर्धा प्रथम रुक्मिणी येलगोंडे, द्वितीय गौरी कुलधर्मे, तृतीय श्रावणी ढगे. मेहंदी स्पर्धा प्रथम साक्षी सावंत, द्वितीय प्राजक्ता यादव, तृतीय सानिया शेख, सानिया मुलाणी, वैष्णवी भोसले, खुशबू तांबोळी. वक्तृत्व स्पर्धा प्रथम क्रमांक हितेश पुंज, द्वितीय दिव्या जाधव, तृतीय निकिता चव्हाण. निबंध स्पर्धा प्रथम वैष्णवी शिंदे, द्वितीय आरती साठे, तृतीय प्राजक्ता यादव, प्राची शिंदे. फोटोग्राफी स्पर्धा प्रथम क्रमांक सानिया शेख, द्वितीय साक्षी सावंत, तृतीय योगेश तुपे, गौरी लोंढे. रील मेकिंग स्पर्धा प्रथम अलोक गोंडे, द्वितीय गौरी जडे, तृतीय प्राची शिंदे, संघव्यवस्थापक प्रा. विनायक माने, वर्गनिहाय सर्वसाधारण विजेतेपद बी. एस्सी भाग ३, विभाग निहाय सर्वसाधारण विजेतेपद बी.कॉम. यांनी पटकावले. आभार डॉ. निवृत्ती लोखंडे यांनी मानले.

पुण्यनगरी SMART सोलापूर
सोमवार, २४ फेब्रुवारी २०२५ | ३

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सव उत्साहात



**अकलूज / प्रतिनिधी**

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात 'सृजनरंग महोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले होते. हा महोत्सव उत्साहात संपन्न झाला.

शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात शिक्षणाबरोबर विद्यार्थींच्या सुप्त कलागुणांना वाव व प्रोत्साहन देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बॉक्स विकेट क्रिकेट स्पर्धा (मुले व मुली), व्हिडिओ रिल मेकींग (तयार करणे) स्पर्धा, मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा, मेहेंदी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा, प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. हा महोत्सव दि. १४ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी या कालावधीत संपन्न झाला.

यामध्ये एकूण ३९७ स्पर्धक सहभागी झाले होते. या महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालायचे प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ.हनुमंत आवताडे, डॉ. सतीश देवकर यांचे हस्ते संपन्न झाला. पारितोषक वितरण वाचन महोत्सव समन्वयक डॉ.विश्वनाथ आवड यांनी केले. पारितोषक वितरण समारंभाचे आभार डॉ. निवृत्ती लोखंडे यांनी मानले.

सुराज्य सोलापूर
रविवार, दि. २३ फेब्रुवारी २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413101



अकलूज : सृजनरंग महोत्सवातील विजेत्या विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील शिक्षक.

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सव साजरा

अकलूज/प्रतिनिधी

अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव मोहिते महाविद्यालयात सृजनरंग महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या सृजनरंग महोत्सवमध्ये बॉक्स विकेट क्रिकेट स्पर्धा (मुले व मुली), व्हिडिओ रिल मेकींग (तयार करणे) स्पर्धा,मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा,पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा,प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात ३९७ स्पर्धक सहभागी झालेले होते.

या महोत्सवाचा पारितोषिक वितरण समारंभ महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. हनुमंत अवताडे,डॉ.सतीश देवकर यांच्या हस्ते संपन्न झाला. पारितोषक वितरण वाचन महोत्सव समन्वयक डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले. पारितोषक वितरण समारंभाचे आभार प्रदर्शन डॉ.निवृत्ती लोखंडे यांनी मानले. स्पर्धेतील निकालः बॉक्स विकेट क्रिकेट स्पर्धा मुले : बी टीम बीएस्सी.भाग २ (प्रथम), मुली क्रिकेट स्पर्धा - बी.ए.भाग २ (प्रथम). पेपर प्रेझेन्टेशन स्पर्धा - श्रावणी ढगे बी.कॉम २ (प्रथम). प्रोजेक्ट सादरीकरण स्पर्धा -रुक्मिणी येल्गोंडे बीएस्सी ३ (प्रथम). मेहंदी स्पर्धा - साक्षी सावंत बी एस्सी ३ (प्रथम).वक्तृत्व स्पर्धा - हितेश पुंज बीकॉम ३ (प्रथम). निबंध स्पर्धा - वैष्णवी शिंदे बी.कॉम ३ (प्रथम). मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा - सानिया शेख बी.कॉम २ (प्रथम). उत्कृष्ट संयव्यवस्थापक - प्रा.विनायक माने (बी.कॉम) वर्गनिहाय सर्वसाधारण विजेतेपद - बीएस्सी भाग ३,विभाग निहाय सर्वसाधारण विजेतेपद - बी कॉम.

दैनिक दिव्य मराठी
# सोलापूर जिल्हा
दक्षिण सोलापूर ▪ उत्तर सोलापूर ▪ मोहोळ ▪ मंगळवेढा ▪ बार्शी ▪ माळशिरस ▪ माढा ▪ करमाळा ▪ सांगोला ▪ अक्कलकोट ▪ पंढरपूर

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA * Akluj Dist. Solapur 413101 *

# भारूडातून पटवले मराठीचे महत्त्व

## अकलूजच्या शंकरराव मोहिते महविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनाला कार्यक्रम

प्रतिनिधी | अकलूज

येथील शंकरराव मोहिते महविद्यालयात कवी कुसूमाग्रज जयंती व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सर्व मराठी साहित्यिकांना वंदना करून व नागनाथ साळवे यांच्या भारूड सादरीकरणाने साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून भारुडकार नागनाथ साळवे,विलास शिंदे,आकाश साठे व नवनाथ कांबळे हे उपस्थित होते.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर हे होते. कार्यक्रमात भारुडकार साळवे यांनी मराठी भाषेचा अभिमान असणा-या सर्व मराठी साहित्यिकांना व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसूमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर, वि. सं. खांडेकर, विं. दा. करंदीकर व भालचंद्र नेमाडे यांना वंदन केले. त्यांनी संत एकनाथ महाराजांच्या आपल्या कलापथकातून वेडी झाली,दादला नको ग



शंकरराव मोहिते महाविद्यालयात भारुड सादर करताना भारुडकार नागनाथ साळवे

बाई ही संत एकनाथांची भारूडे, गौळणी, लावणी, भावगीते सादर करून उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनींना संताच्या विचाराचा,मराठी प्रेमाचा, अभिमानाचा,मराठी भाषा ही अमृताहून गोड असल्याचा संदेश दिला. या वेळी डॉ. सतीश देवकर, डॉ. विश्वनाथ आवड, डॉ. शिरीषकुमार शिंदे, डॉ. सज्जन पवार, डॉ.चंद्रशेखर ताटे उपस्थित होते.

जनसत्य
शनिवार, दि. १ मार्च २०२५

SHANKARRAO MOHITE MAHAVIDYALAYA
Akluj
Dist. Solapur
413101

# मोहिते महविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

जनसत्य, प्रतिनिधी

**माळशिरस :** अकलूज येथील शंकरराव मोहिते महविद्यालयामध्ये कवी कुसूमाग्रज जयंती व मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रमासाठी प्रमुख अथिती म्हणून भारुडकार नागनाथ साळवे,विलास शिंदे,आकाश साठे व नवनाथ कांबळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारुडकार साळवे यांनी मराठी भाषेचा अभिमान असणा-या सर्व मराठी साहित्यिकांना व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसूमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर,वि.स.खांडेकर,विं. दा.करंदीकर व भालचंद्र नेमाडे यांना वंदन केले.त्यांनी संत एकनाथ महाराजांच्या भारूड सादरीकरणातून उपस्थिती



विद्यार्थी विद्यार्थ्यींनींना संताच्या विचाराचा,मराठी प्रेमाचा, अभिमानाचा,मराठी भाषा ही अमृताहून गोड असल्याचा संदेश दिला. आपल्या कलापथकातून त्यांनी वेडी झाली...,दादला नको ग बाई... ही संत एकनाथांची भारूडे,गौळणी,लावणी,भावगीते सादर करून प्रबोधन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्राम सिंह मोहिते पाटील, अभिजित रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद डॉ.सतिश देवकर,डॉ.विश्वनाथ आवड,डॉ.शिरीषकुमार शिंदे,डॉ. सज्जन पवार,डॉ.चंद्रशेखर ताटे, प्रा.चव्हाण,सौ.मिले मॅडम, कार्यालयीन निबंधक राजेंद्र बामणे,अधिक्षक युवराज मालुसरे व विद्यार्थी,विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.विनायक सूर्यवंशी यांनी केले तर सूत्रसंचलन डॉ.जनार्धन परकाळे यांनी केले.

जनसत्य
सोमवार, दि. ०६ जानेवारी २०२५

# मोहिते महाविद्यालयात महिला विषयक कायदेवर व्याख्यान

जनसत्य, प्रतिनिधी

**माळशिरस** : अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून अंतर्गत तक्रार निवारण समिती, अँटी रॅगिंग समिती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला कायदेविषयक सल्ला' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डव्होकेट सौ.धनश्री रिसवडकर मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले होते.तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. के. टिळेकर हे उपस्थित होते.



या कार्यक्रमाच्या सुरुवातीला माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी कै.शंकरराव मोहिते पाटील व कै.रत्नप्रभादेवी मोहिते पाटील तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे सौ.रिसवडकर मॅडम आपल्या भाषणात सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांचे शिक्षणातील योगदान या विषयी विचार मांडले. व त्यानंतर राज्यघटनेमध्ये महिलांविषयी असणाऱ्या कायद्यांची माहिती दिली. राज्यघटनेमध्ये अनेक कलमा पैकी त्यांनी कलम १४ ते ५० मधील सर्व कायदे उपस्थितांना सांगितले.यामध्ये महिलांना कामाच्या ठिकाणी संरक्षण कायदा,बालविवाह प्रतिबंधात्मक कायदा, मिळकतीतील हक्क कायदा, हिंदू विवाह कायदा,विशेष विवाह कायदा,समान वेतन कायदा अशा अनेक कायद्याविषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. यासाठी शासनाने महिला आयोगाची देखील स्थापना केल्याचे सांगितले.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.के. टिळेकर यांनी म हाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सांगितले की,नैतिकतेचे धडे हे विद्यार्थ्यांना त्यांच्या घरातूनच मिळाले पाहिजेत घरातून मि ळणाऱ्या शिक्षणावरच मुले पुढे अनुकरण करत असतात केवळ महिलासाठीच विशेष कायदे आहेत असं नाही तर पुरुषांना देखील कायद्यांची माहिती असावी.